# युवास्पंदन

एकविसाव्या शतकातील युवामनाचे
प्रातिनिधिक स्पंदन

फेब्रुवारी २०१७ वर्ष- चौथे
अंक सहावा




# अविस्मरणीय प्रसंग विशेषांक

## मराठी विभाग

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित
पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि.सांगली.

अंक- सहावा,
वर्ष- चौथे

# युवास्पंदन

अविस्मरणीय प्रसंग

२७ फेब्रुवारी २०१७
मराठी राजभाषादिन

विशेषांक

## संपादक मंडळ

**अध्यक्ष व प्रकाशक**



प्राचार्य.डॉ.आर.आर.कुंभार

**मुख्य संपादक**



प्रा.डॉ.टी.के.बदामे

**संपादन सहाय्य**



वर्धमान राजेंद्र बोथरा
एम.इ.भाग-१

**संपादक**



कु.अनघा पोपट पाटील
बी.ए.भाग-३

**उपसंपादक**



स्वप्निल अशोक कुंभार
बी.ए.भाग-३



कु.फरहीन खं. अन्सारी
बी.एस्सी-२



कु.पूजा केशव माळी
बी.ए.-२



कु.प्रिया सुखदेव माळी
बी.ए.-२



कु.स्नेहल तानाजी चव्हाण
बी.एस्सी-३

@ सर्व हक्क युवास्पंदनकडे पुनर्मुद्रणासाठी संपादक मंडळाची परवानगी आवश्यक

# अनुक्रमणिका


| अ.न. | लेखकांचे नाव | लेखाचे नाव | पान नं |
|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. तातोबा कल्लाप्पा बदामे. | मुख्य संपादकीय | ०२ |
| २ | कु. अनघा पोपट पाटील. | माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग.. | ०४ |
| ३ | कु. पुजा केशव माळी. | अविस्मरणीय कॉलेजचे दिवस.... | ११ |
| ४ | कु. प्रिया सुखदेव माळी. | माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग.. | १५ |
| ५ | कु. फरहीन ख. अन्सारी. | एक अविस्मरणीय प्रसंग.... | १८ |
| ६ | कु. प्रियंका म. साखरे. | आमची अविस्मरणीय सहल. | २२ |
| ७ | कु. मयुरी भूपाल पाटील. | माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण... | २७ |
| ८ | कु. सुवर्णा महादेव कदम. | माझा अविस्मरणीय प्रसंग.... | ३३ |
| ९ | कु. स्नेहल तानाजी चव्हाण. | पंजाबी कुर्ता | ४५ |
| १० | कु. आक्षता सुरेश माईनकर. | अविस्मरणीय पेन... | ४९ |
| ११ | कु. उज्वला मारुती टकले | आदर्श विद्यार्थी | ५३ |

# मुख्य संपादकीय

**युवक विद्यार्थी मित्रांनो,**

युवास्पंदनाच्या अंकाची आपण आतुरतेने वाट पाहता असता, या तुमच्या प्रतिसादामुळेच आम्हाला दरवेळी नव्या स्वरूपात अंक प्रकाशित करण्याची प्रेरणा मिळत असते. यावेळी 'अविस्मरणीय प्रसंग' हे विषयसुत्र घेवून युवास्पंदन आपल्या भेटीला येते आहे. दरवेळीप्रमाणे याही अंकाचे स्वागत आपण कराल, अशी आम्हाला खात्री वाटते.

नवोदित विद्यार्थी लेखकांनी अतिशय उत्कटपणे आपल्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. सोशल मीडीयाच्या प्रभावाखाली वावरत असताना युवास्पंदनसारख्या अंकासाठी लिहिणाऱ्या मुलांचे खरोखर कौतुक वाटते. धडपडणाऱ्या या युवकांनी असेच लिहित राहावे. आपले वाचन वाढवावे. अभिव्यक्तीच्या सधन प्रत्ययासाठी दर्जेदार वाचनाला पर्याय नाही. आपणा सर्वांना उज्ज्वल भविष्यासाठी युवास्पंदनच्या शुभेच्छा!

कार्यकारी संपादक अनघा पाटील, बी.ए.भाग ३ व उपसंपादक स्वप्निल कुंभार बी.ए.भाग ३ या विदयार्थ्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. अंक प्रकाशनाचे शिवधनुष्य त्यांनी नुसते पेलले असे नाही तर त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे खुप दर्जेदार असा हा अंक तयार झाला आहे.

युवास्पंदन ला आता मागे वळून पाहण्याची आवश्यकता उरली नाही. परंतू अंक आणखी दर्जेदार व नियमितपणे प्रकाशित करण्यासाठी वाचकांच्या आर्थिक पाठबळीची गरज आहे. वाचकांना मी नम्र आवाहन करतो की आपण युवास्पंदनचे आजिव वर्गणीदार होवून युवास्पंदनला सहकार्य करावे.

मुख्य संपादक
प्रा. डॉ. टी.के बदामे, विभाग प्रमुख,
पदवी व पद्व्युत्तर मराठी विभाग,
पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील
महाविद्यालय, तासगांव, जि. सांगली
चलभाष. ९८५०६७७०३९

कु. पाटील अनघा पोपट
बी. ए. भाग — ३ (मराठी)

## माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ....

जन्म आणि मृत्यू या दोघांच्या मध्ये जो खेळ चालतो त्याला 'आयुष्य' असहे नाव. असहे म्हणतात, 'आयुष्य' म्हणले तरी काय हो? मला माहीत आहे, प्रत्येकाच्या लेखी हे आयुष्य खूप वेगवेगळे असणार आहे. कुणाच्या दृष्टीने हे खून सुंदर, रम्य, सुख, आनंद देणारे तर कुणाच्या लेखी धकाधकीचं, धावपळीचं, कंटाळवाणं, जास्त काही अपेक्षा नसणारं. पण, या आयुष्यात आपण रोज नवनव्या अनुभवांनी युक्त असच कळत — नकळत घडत असतो. ऊन — सावल्यांचा हा खेळ आपल्याला या आयुष्याशी रंगमंचावर परिपूर्ण असा घडवण्यास कारणीभूत ठरतो. रोजच उगवणाऱ्या आणि मावळणाऱ्या सूर्याच्या साक्षी आपण आपल्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांचे साक्षीदार असतो. रोज घडणाऱ्या या घटना आपल्याला अनेक चांगले — वाईट प्रसंग देवून जातात. काही घटना काळाच्या आणि बुध्दिच्या — स्मृतीच्या आड कधी गडप होवून जातात हे, ही कळत नाही. पण असेही काही घटना प्रसंग असतात, की ज्या आपल्या मनामध्ये आयुष्यभरासाठी घर करून राहतात. त्यांची एक वेगळी जाणीव आपल्या ह्रदयामध्ये असते. कारण स्मृतीमध्ये राहण्यास कारणीभूत असा बरा — वाईट — चांगला धक्का त्या आपल्याला देवून गेलेल्या असतात. कुणाच्या आयुष्यात तो सुखद धक्का असेल तर, कुणाच्या

आयुष्यात दु:खद. मनाला लागणारा, आयुष्याच्या थोडया काळासाठी आपल्याला पूर्ण हलवणारा असाही असेल. त्याचमुळे या घटना आपल्या स्मृतीमंधून न जाणाऱ्या 'अविस्मरणीय' अशा असतात. अशा थोडयाफार अविस्मरणीय घटनांनी आपलं आयुष्य भरून गेलेलं असतं.

माझंही आयुष्य काही वेगळं अस नाही. थोडया म्हणण्यापेक्षा असंख्य अशा वाईट प्रसंगांनी, घटनांनी आतापर्यंत घडलेलं माझं आयुष्य, मला अनेक अविस्मरणीय

असे प्रसंग देवून गेलय. यातील बरेच प्रसंग 'जीवावरून' गेलेले असेही आहेत तर, माझ्या आयुष्यातील महत्त्वाची व्यक्ती ज्या वेळी काळाच्या पडदयाआड गेल्या, त्यावेळेचेही प्रसंग आहेत जे माझ्या आयुष्यात'बदलता न येणारे असे बदल घडवून गेले'. काही दिवसांकरीता काळांकरीता जे घडलय ते खरं आहे! हे मन मान्यही करत नव्हतं. कारण त्यामुळे पूर्ण थंड पडलेलं शरीर, गरम झालेलं रक्त आणि वेगाने वाढलेले ह्रदयाचे ठोके आजही त्या प्रसंगाची आठवण करून देण्यास जाणीव रूपाने कारणीभूत ठरतात. अशीच अवस्था झालेली माझ्या आयुष्यातील एक प्रसंग म्हणजे —,

बारा — तेरा वर्षापूर्वीची गोष्ट नुकत्याच वार्षिक परीक्षा होवून उन्हाळयाच्या सुट्टी लागलेली होती. आता सुट्टी म्हटल्यावर सगळया मुलांसारखाच आमचाही मामांच्या गावी जाण्याचा बेत अगोदरच ठरलेला

होता. आमच्या मामांचा गाव म्हणजे, खूप सारी शेती, आंब्यांची बाग आणि घरभरून असणारी माणसं या सगळयामुळेच माझ्या मनामध्ये मामाच्या गावाचं आकर्षण आणि ओढ ही वर्षभरासाठी लागून राहीलेली असायची. या सुट्टीतही आई – बाबा – आजी – मी आणि माझा लहान भाऊ आम्ही सगळे मामांच्या गावी आलो होतो. रोजच्या धकाधकीच्या आयुष्यातून बाजूला जावून आम्ही सगळे या सुट्टीचा खूप आनंद घेत होतो. तसंही सगळयांची निवांत भेट होण्यास ही उन्हाळयाची सुट्टीच आम्हाला मिळायची. बाकीचे नऊ – दहा महिने आम्हा सगळयांची शाळा असल्याने वेळच नाही मिळायचा. यातच उन्हाळा असल्यामुळे आंब्यांचा सिझनही सुरू होता. मग तर काय आणखीनच मज्जा! मी, माझा भाऊ मिळून घरात जवळपास आम्ही आठ ते नऊ जण मुले झालो होतो. दिवसभर घरभर दंगा, दुपारी सर्वांसोबत आंब्यांवरती मारला जाणारा ताव आणि सायंकाळी शेतात फिरायला जाणं हा जणू आमचा ठरलेला बेत असायचा. आठ – दहा दिवस असेच मजेत गेले आणि आई – आजीने मिळून मामांच्या गावापासून जवळ असलेल्या आजीच्या भाचीच्या गावी

जाण्याचा बेत केला. जी माझ्या आईची सख्खी मामे बहीण. बाबांना काही काम लागल्यामुळे ते आमच्या सोबत येणार नव्हते. आई, आजी दोघीच जाणार होत्या. त्यांच्या सोबत आम्हा दोघांना, मी आणि माझ्या छोटया भावाला घेवून जाण्याचं त्यांनी ठरवलं. कारण आजीच्या मते,

'आल्या गेल्याशिवाय ओळख राहत नाही. आपली माणसं मुलांना कळत नाहीत, अजून मुलं लहान आहेत. त्यांच्या पाठीमागचं व्याप कमी आहे. उदया शाळा मोठया झाल्या की, त्यांना कुणा पाहूण्यांकडे जाण्यास वेळ मिळणार नाही. मग ओळख पाहुण्यांची कशी आणि कधी होणार'. अशा विचारांनी आम्हा दोघांना घेवून जाण्यांचचं ठरलं. मामा आम्हाला बसला सोडून गेले. पण, त्या दिवशी खूप वेळ थांबूनही आम्हाला बस मिळालीच नाही. वेळ खूप होत होता, थोडा वेळ पाहुण्यांच्या घरी थांबून आम्हाला परत मामाच्या गावी यायचं होतं. त्यामुळेच आता कोणतीही गाडी येवूदे त्याने जाण्याचं आई – आजीने ठरवलं. आम्ही दोघेही खूप वैतागलो होतो. आमचे खेळून वगैरे सोडून या दोघी आम्हाला यांच्या सोबत घेवून आल्या होत्या आणि, त्यात आता बस मिळेना. इतक्यात आईच्या मामे बहीणींच्या गावातून पुढे जाणारी दुधाची गाडी आली. आम्ही जाणाऱ्या गावाला जाणारी अजून दोन माणसं आमच्या सोबत होती. असे आम्ही सहाजण त्या दुधाच्या गाडीत बसून पाहूण्यांच्या गावी येवून पोहोचलो. गाडीतून उतरण्यासाठी आईने गाडीचा दरवाजा उघडला. आई खाली उतरली. तिच्या पाठीमागे आजीने उतरून मला आणि माझ्या भावाला खाली घेतले. ज्या गाडीतून आम्ही आलो, त्या गाडीच्या ड्रायव्हरला पैसे

देण्यासाठी आई पैसे काढत होती, आणि कसे माहित नाही, आईचे लक्ष पाठीमागून येणाऱ्या भरधाव ट्रककडे गेले. आईतर पैसे देण्याच्या तयारीत असल्यामुळे ती रस्त्याच्या मधोमध उभी होती. आणि आम्ही सगळेही तिच्याभोवतीच. तसेही त्या गावाला फारश्या गाडया नसल्यामुळे रहदारी तशी कमीच आईचे लक्ष्य ट्रककडे जाताच माझी आई, तिच्या आईला जोराची ओरडली "आई पाठीमागे सखु" आई ओरडताच आमच्या सोबत असणाऱ्या दुसऱ्या माणसाला गाडीच्या ड्रायव्हरने गाडीमागे ढकलले आणि गाडीचा दरवाजा पटकन झाकून घेतला. आईने माझ्या भावाला घट्ट पकडले होते आणि आजीने माझ्या हाताला. काही कळायच्या आत तो भरधाव ट्रक आम्ही आलेल्या गाडीला घासत, गाडीचा पत्रा फाडत, आमच्या पासून फक्त चार बोटांच्या अंतराने निघून गेला. आमच्या गाडीच्या ड्रायव्हरने ढकललेला माणूस तर, अक्षरशः पाठीमागे झाडाच्या बुंध्यात पडला म्हणूनच तो वाचला, आणि आम्ही सगळे थोडेसे पाठीमागे झुकलो म्हणूनच! नाहीतर तो ट्रक आमच्या सगळयांच्या पायावरूनच गेला असता. हे सगळे झाले तेव्हा आम्ही सगळयांनी डोळे घट्ट मिटून घेतले होते. पण एका सेकंदात आमच्या समोरून ज्या वेगाने तो ट्रक गेला की, त्यावेळी असं वाटलं, 'आपण घेतलेला हा श्वास बहुतेक शेवटचा असावा'मी सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे ह्रदयाचे ठोके खूप वेगाने

पडत होते. संपूर्ण शरीर थंड पडलेलं होतं आणि शरीरभर रक्त वेगाने पळत होते. ज्यावेळी आम्ही डोळे उघडले त्यावेळी आम्ही आलेल्या गाडीची अवस्था बघण्यासारखी झाली होती. थोडा अंतर जावून तो ट्रक थांबला नंतर कळाले की, ट्रकचे ब्रेक फेल झाले होते. आणि चालकाच्या कंट्रोलच्या बाहेर ट्रक गेला होता.

आम्ही चौघे थोडयावेळानंतर ज्या पाहुण्यांच्या घरी जाण्यासाठी आलो होतो, त्यांच्या घरी गेलो पण, आम्हा सगळयांचे पाय खूप थरथरत होते. त्या एका सेकंदात आमच्या सगळयांचे आयुष्य बदललं होतं. तो एक सेकंद आमच्या आयुष्यामध्ये खूप भयंकर असा वाईट प्रसंग देवून गेला असता.

आता हे सगळं आठवले तेव्हा वाटलं, जर आईचं लक्ष त्या भरधाव येणाऱ्या ट्रककडे गेलच नसतं तर.... आईही म्हणते,... "मला माहीत नाही माझं लक्ष कसं गेलं ते पाठीमागे. पण, ज्यावेळी गेलं लक्ष त्यावेळी, आई पाठीमागे सरक हे ओरडल्याशिवाय बाकीचं मला काहीच समजलं — सुचलच नाही. हे मात्र नीट आठवतं की, त्या ट्रकचं नाव 'रामकृपा' होतं" मला माहित नाही, या जगात देव आहे की, नाही किंवा आहे — नाहीच्या वादात मला पडायचे ही नाही, पण माझा विश्वास या जगात असलेल्या 'सकारात्मक शक्तीवर' आहे. जी शक्ती

अशा वेळी कुठून तरी आपल्याला बुध्दी देते आणि आपल्यावरती येणाऱ्या संकटांची जाणीव करून देते. त्यांमुळे येणारी संकटे तर टाळू शकत नाही आपण पण, त्यांची तीव्रता नक्कीच कमी करू शकते.

असा हा आमच्या सगळयांच्या जीवावरून गेलेला प्रसंग आजही जेव्हा आम्ही पाठीमागे वळून पाहतो तेव्हा, असं वाटतं – 'आज जे जगतोय ते आपल्याला मिळालेलं दुसरं आयुष्य आहे'. यानंतर मात्र अजूनही मला आणि माझ्या भावला त्या गावाला जाणं झालेलं नाही. भीती पोटी असं काही नाही तर, पुन्हा कधी प्रसंगच आला नाही.

अलीकडेच त्या आईच्या मामे बहिणीचे मिस्टर वारले. आणि आई आणि आजीला त्या गावी जाण्याचा प्रसंग आला. त्याचमुळे पुन्हा त्या सगळया आठवणी जाग्या झाल्या.

कु. पुजा केशव माळी
बी. ए. भाग — २

## माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ....

आपल्या आयुष्यात काही दिवस असे असतात, जे आपल्या दृष्टीने खुप महत्वाचे असतात. आणिते महत्वाचे दिवस आपण लक्षात ठेवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्यांना विसरणे सुध्दा कठीण असते. कारण ते दिवस आपलया मनावर चांगलेच एकवटलेले असतात.

हेच आपल्याच आयुष्यातील क्षण काही चांगले असतात तर काही वाईट असतात. फरक फक्त एवढाच असतो की चांगले क्षण आपण सारखे—सारखे मनात ठेवण्याचा प्रयत्न करतो, तर वाईट क्षण विसरून जाण्याचा प्रयत्न करतो आणि असाच एक क्षण माझ्या आयुष्यात येऊन गेला. तो म्हणजे माझ्या कॉलेजचे ते दिवस.

नुकतेच माझी १० वी बोर्डाची Exam संपली आणि सुट्टी चालू झाली. सुट्टी तशी मी खुप मजेत घालवली. पण मला ओढ होती की कॉलेजची, कधी एकदा मी कॉलेजला जाते. अशी एक मनात आशा निर्माण झाली होती. कॉलेजचे Admmisson चालू झाले. मला Admmisson मिळालेसुध्दा. पण नंतर ओढ लागली तरी कॉलेजच्या पहिल्या दिवसाची की कसा असेल कॉलेजचा पहिला दिवस. कसे असतील नवीन Class Teacher . कसे असतील नवीन मित्र—मैत्रीणी. थोडक्यात काय तर कॉलेजचा पहिला दिवस

अनुभवायचा याची ओढ मला लागली होती. आणि तो माझ्या आयुष्यातील महत्वाचा क्षण आला. मी पहिल्या दिवशी कॉलेजला गेले. मी माझ्या Class मध्ये गेले. मला सगळया मैत्रिणी नवीनच होत्या. पहिले दोन–तीन तास मला जरा बोअर झाले. पण नंतर नवीन मैत्रिणी भेटू लागल्या. सगळयांची ओळख होण्यास सुरवात झाली. आणि त्यातुनच पहिल्याच दिवशी मी आणि माझ्या मैत्रिणींनी आमचा एक नवीन ग्रुप तयार केला. आमची खुप घट्ट मैत्री जमली. असाच माझा कॉलेजचा पहिला दिवस संपला. नंतर दररोज कॉलेजला जाणे, दंगामस्ती करणे पण तितकाच अभ्यासदेखील करणे हे आमच्या ग्रुपने ठरवले होते. कधीकधी Lecture miss करणे हे सर्व मी कॉलेज life मध्ये enjoy केले. त्यानंतर मी माझ्या कॉलेजमध्ये खुप रमून गेले होते. मला असे वाटत होते की, ते कॉलेज नुसन माझे घरच आहे. त्याचबरोबर मला माझ्या मैत्रिणी पण खुप छान भेटल्या होत्या. त्याचबरोबर मला कॉलेज करताना नवीन करण्याचा सुध्दा छंद होता. मी माझ्या कॉलेजमध्ये विविध कार्यक्रमांत सहभागी होत होते. त्यातुनच मला एक कविता आठवली.

कॉलेज म्हणजे काय असतं?
पहिल्या दिवशी घाबरलेलं मन असतं.
आयुष्याचं आपल्याला नव्या FRIENDS चं देणं असतं,
सवय झाली की मग मोकळं रान असतं...
आणि मग नकळत आपण म्हणतोक, ''जीवन हे किती छानं असतं''

कॉलेज म्हणजे काय असतं?

कधीतरी परिक्षेत येणारं TENSION असतं,

LECTURE BUNK करून सिमनेमाला जाणं असतं.

CANTEEN मध्ये बसून FRY RICE खाणं असतं.

एखादयाला TARGET करून त्याला सतत चिडवणं असतं...

कॉलेज म्हणजे काय असतं?

SEND OFF च्या दिवव्शी आपलं मनं घट्ट करणं असतं.

कुठेतरी कोपऱ्यात जाऊन लहान बाळांसारखं रडणं असतं.

घरी आल्यावर सुध्दा त्याच विश्वात रमणं असतं.

आणि मग MSG FORWORD करत रात्र, रात्र जगणं असतं.

कॉलेज म्हणजे हेच असतं.... कॉलेज म्हणजे हेचं असतं....

हळूहळू कॉलेजचे ते आठवणीतलेदिवस संपल आहे. मी आणी माझ्या मैत्रिणी आता कॉलेज संपल्यावर एकमेकांपासून लांब जाणार याचा विचार मी आता हळूहळू करू लागले होते. आणि तो विचार केला की माझ्या डोळयातून अलगद पाणी यायचे. कारण इतके दिवस मी व माझ्या मैत्रिणी आम्ही खूप हसलो, खेळलो, दंगा केला, अभ्यास केला, एकमेकांसोबत आमची सुखदु:ख वाटून घेतली. एकमेकांना संकटकाळी मदत केली. या सगळया गोष्टीपासून आता आम्ही लांब जाणार होतो. पण जावं तर लागणारच होतं. पण त्यापासून लांब

जाताना मी खूप रडले. इतके दिवस मैत्रिणीसोबत राहून एकदमच लांब जाणं ही गोष्ट माझ्या मनांत घरं करून राहिली होती.

अशा पध्दतीने मी माझ्या आयुष्यातील ते चांगले व वाईट क्षण अविस्मरणीय क्षण अनुभवले. असे ते अविस्मरणीय क्षण पुन्हा पुन्हा यावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

कु. प्रिया सुखदेव माळी
बी.ए. भाग २

## एक आयुष्यातील अविस्मरणीय क्षण

प्रत्येक आयुष्यात वेगवेगळया प्रकारचे प्रसंग घडत असतात त्यातील काही प्रसंग न विसण्यासारखे असतात. ते कायम स्वरुपी आपल्या मनामध्ये घर करुन राहतात. तो क्षण किंवा तो प्रसंग आपण कधीच विसरु शकत नाही आणि तो क्षण प्रत्येकांच्या आयुष्यात येतच असतो. मला तर वाटते जगामध्ये असा कोणताच व्यक्ती नसेल की त्याच्या आयुष्यामध्ये अविस्मरणीय प्रसंग घडलाच नाही. कारण जीवन जगत असताना छोट – माठे प्रसंग घडतमच असतात त्यातील काही प्रसंग आपल्या स्मरणात राहतात. काही प्रसंग असे असतात की व्यक्तिचे पूर्ण जीवनच बदलून टाकतात.

अविस्मरणीय प्रसंग म्हणजे कार्य तर ज्या प्रसंगाचे कधीच विस्मरण होत नाही. जो आपल्या कायम स्मरणात राहतो. असा प्रसंग म्हणजे अविस्मरणीय प्रसंग असतो. असे प्रसंग आठवणीच्या स्वरुपात कधीतूरी बाहेर पडतात असे प्रसंग आनंदाचे किंवा दु:खाचेही असू शकतात कधी कधी त्या प्रसंगांचे स्मरण झाले की, आनंदाचे प्रसंग आनंद देऊन जातात. व दु:खाचे प्रसंग मनाला इमोशनल करुन सोडतात. माझ्याही जीवनात असे काही प्रसंग घडले आहेत त्यातील एक प्रसंग मी तुमच्यासमोर या पुस्तकांच्या माध्यमातून मांडते. मी इयत्ता बारावी आर्टस मध्ये शिकत असताना आमच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होती.

रहायला व्यवस्थित घर नव्हते. पावसाळयामध्ये पाऊस पडायला लागला की मनामध्ये खूप भिती वाटायची घरापासून कॉलेज खूप दूर अंतरावर होते. बसची सोय नव्हती दररोज चालत जायला लागायचे खूप त्रास व्हायचा. बारावीची परिक्षा फी भरायची होती आणि फी भरायला घरामध्ये पैसे नव्हते घरामध्ये मम्मी– पप्पा म्हणू लागले फी भरायला पैसे नाहीत कॉलेजलाच जावू नकोस, कॉलेज सोड आता बास झाल तुझं कॉलेज मनामध्ये खूप वाईट वाटत होत खूप रडायला येत होत कॉलेज सोडण्याची तर इच्छाच होत नव्हती. नंतर मग कॉलेजमध्ये जाऊन सरांना अडचण सांगितली सर खूप चांगले होते त्यांनी माझी बारावीची परिक्षा फी भरली ते मी कधीच विसरणार नाही.

फेब्रुवारी महिन्यात परिक्षा होती कॉलेजमधून रिसीट घेतले परिक्षेचे केंद्र हे दुसऱ्या गावी असल्यामुळे त्या गावी जायला लागायचे कधी कधी वेळाने पेपर असायचे. तिथून यायला खूप वेळ व्हायचा परिक्षा झाली आणि सुट्टया लागल्या . सुट्टीचे दिवस कसे संपले तेच कळाले नाही आणि मग रिझल्टची वेळ आली रिझल्टचा दिवस उगवला. रिझल्ट म्हटल्यावर प्रत्येकाच्या मनामध्ये भिती निर्माण होते त्याच प्रकारे माझ्याही मनामध्ये भिती निर्माण झाली होती चांगले मार्कस् पडले तरच पुढे शिकायला घरच्यांकडून परवानगी मिळणार होती नाही तर मग घरी बसण्याशिवाय पर्याय नव्हता एक वाजता सर्वांचे रिझल्ट कळणार होते. रिझल्ट पाहूच नये असे मनामध्ये वाटत होते नेटवरुन

रिझल्ट पहायला सांगितला होता रिझल्ट बघितल्यावर लगेच फोन आला आणि ७२ टक्के मार्कस् मिळाले आहेत हे कळल्या कळल्या मम्मीच्या डोळयातून पाणी येऊ लागले. त्यावेळी ती खूप खूष झाली होती. घरातील सर्वानाच आनंद झाला होता. मम्मीला झालेला आनंद हा मला तिच्या डोळयांमध्ये दिसत होता कारण ते अश्रू हे आनंदाचे होते ते खुषीचे अश्रु मनाला वेगळाच आनंद देणारे होते ते मी कधीच विसरु शकणार नाही.

तिथे निर्माण झालेले वातावरण सर्वाच्या चेहऱ्यांवरील आनंद माझ्या कायम स्मरणात राहणार आणि तो जो प्रसंग होता तो कधीच न विसरण्यासारखा होता.

फरहिन खलिकुज्जमा अन्सारी
बी.एस्सी. भाग २

## एक अविस्मरणीय प्रसंग

प्रत्येक मनुष्य जन्माला येताना आपली काही स्वप्ने जीवनात घेऊन येतो. काहींची स्वप्ने पूर्ण होतात तर काही स्वप्ने अपुरी राहतात. पण त्या अपुरी स्वप्नातही काही यश लपलेले असते. प्रत्येक मनुष्याच्या जीवनात त्याचा स्वत:चा एक प्रसंग असतो की, तो संपुर्ण आयुष्य त्या प्रसंगावर जगत असतो. माझ्याही आयुष्यात असाच एक अद्भूत आनंदायी व कधी न विसरणारा तसेच माझ्या आयुष्याला कलाटनी देणारा प्रसंग म्हणजे '' माझी बालवैज्ञानिक'' म्हणून झालेली निवड ही माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय प्रसंग आहे.

'' सतत अपयशाला सामोरे जात,
असतानाही जो काम करण्याचा,
उत्साह हरवत नाही,
त्याला यशाची वाट मिळालेली असते''

वरील वाक्याप्रमाणे माझ्याही आयुष्याला बदल घडवणारा तो क्षण होता. विज्ञान विषयाची आवड तर मला लहानपणापासूनच होती. कारण, आकाशातल्या अनेक गोष्टींकडे लक्ष केंद्रित होत असताना मनात अनेक विचार येत की सुर्यकिरण हे एकाच सरळ मार्गाने पृथ्वीवर का येते? तारे रात्रीच्याच वेळी का लखलखतात? आपण पृथ्वीवरच का राहतो? आकाश निळेच का आहे? इत्यादी

प्रश्न माझ्या मनात सतत फिरत असतं. या सर्वामुळे जिज्ञासू वृत्ती जागी झाली. इयत्ता १० मध्ये असताना मला माझ्या मुख्याध्यापिकांनी ऑफिसमध्ये बोलावले व सांगितले की "मला एक वैज्ञानिक विषय डोळयासमोर ठेवून एक प्रकल्प बनवायचा आहे" ही गोष्ट प्रथम ऐकताच मला खुप भिती वाटू लागली कारण असे होते की १० वी म्हणजे आयुष्यातील कलाटणी देणारा क्षण अभ्यासातील हदय हदय म्हणून १० वी इयत्तेकडे बघितले जाते. मी न्यू आदर्श माध्यमिक विद्यामंदीर विटा येथील शिकते होते. परंतु मनात जिज्ञासू वृत्ती होती. ध्येय समोर होते फक्त इच्दा होती ती ध्येय गाठण्याची

"येताना काही आणायचं नसतं,
जाताना काही न्यायचं नसतं,
परंतु ध्येय गाठताना मात्र,
एकदा तरी जन्माला यायच असतं,

घरचे वातावरण शिक्षित होते. माझ्या वर अफाट प्रेम करणाऱ्या आई वडिलांनी व माझ्या भावांनी मला पाठिंबा दिला. मनात दृढ इच्छा बांधली व प्रकल्प कार्याच्या शोधात लागली. शाळेच्या आसपासचा परिसर होता तो म्हणजे औद्योगिक वसाहतींचा सुत गिरणीचा या सर्वावर अफाट खर्च म्हणजे उर्जा यावरुन मी 'सेव्हिंग एनर्जी' या विषयावर लक्ष केंद्रित करत प्रकल्प व मॉडेल तयार केला." या सर्व कार्यात मला विज्ञान विषय शिकवणाऱ्या

सौ.एस धनवडे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. एक महिन्याच्या काळात प्रकल्प कार्य पूर्ण झाले. मॉडेल व 'प्रकल्प लेखन' असे दोन टप्प्यात काम पूर्ण झाले दिवस उजाडले ते तालुकास्तरी विज्ञान प्रर्दशनाचे जे 'नॅशनल कॉंग्रेस ज्युनिअर सायनटिस्ट' या आयोगातर्फे आयोजित करण्यात आले होते. ती तालुकास्तरीय स्पर्धा खानापूर येथे आयोजित करण्यात आली. ८४ प्रकल्पामधून माझ्या प्रकल्पाची निवड झाली. आनंदाचा पारावारच राहिला नाही. परंतु, धनवडे मॅडम यांची इच्छा होती, ती म्हणजे प्रकल्प राज्यस्तरीय नेण्याची दिवस आला 'जिल्हास्तरीय' स्पर्धेचे ठिकाण होते मिरज ४२ प्रकल्पामधून विभागासाठी ५ प्रकल्प जाणार होते. तेथेही माझ्या व शिक्षकांच्या प्रयत्नाने प्रकल्पाची निवड झाली. यामुळे माझा आनंद गगनात मावत नव्हता. पण या आनंदातूनही पाय माझे जमिनीवरच होते. कारण म्हणतात ना.. .........

" आयुष्यात यशाच्या पायऱ्या चढताना,
वाटेत भेटणाऱ्यांशी चांगले वागावे,
कारण, खाली उतरताना तेच लोक,
आपल्याला खाली भेटतात."

मला उत्सुकता होती ती म्हणजे विभागीय व नंतर राज्यस्तरीय स्पर्धेची दिवस लवकर जवळ येऊ लागले व पुणे विभागात सांगली जिल्हयात माझ्या प्रकल्पाची निवड झाली व १ व २ डिसेंबर २०१२ रोजी राज्यस्तरीय स्पर्धा 'धुळे' या ठिकाणी पार पडणार

होत्या. मी व माझे शिक्षक दिनांक २८ नोव्हेंबर रोजी 'धुळे' या ठिकाणी रवाना झालो व अखेर २९ नोव्हेंबर २०१२ रोजी धुळे येथे पाहोचल्यावर मनात नानाविध प्रकारची भिती वाटू लागली. कारण तेथे अनेक स्पर्धक विविध जिल्हयातून आले होते. कसेतरी मनाला शांत करत होते कारण समोर माझे ध्येय व दिवस प्रकल्प सादर झाला मात्र उत्सुकता होती ती म्हणजे निकालाची २ डिंसेबर २०१२ रोजी निकाल जाहिर होऊ लागले. मी मनात आई– वडिलांचे नाव घेत होते तेव्हाच माझ्या नावाची घोषणा झाली व डोळ्यांतला थेंब हातावर पडताक्ष समजले हे स्वप्न नव्हे सत्य आहे. आनंदाने 'स्मृतीचिन्ह' व प्रमाणपत्र घेत माझी बालवैज्ञानिक म्हणून घोषणा झाली व आम्हाला लोगो ही देण्यात आला. २ डिसेंबर २०१२ हा माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय प्रसंग आहे. व तो माझ्या आयुष्याला कलाटणी देऊन गेला.

वरील लेख वाड्मय: चैर्य नाही.

कु. प्रियांका म. साखरे
बी.एस्सी. भाग ३ (गणित)

## आमची अविस्मरणीय सहल

प्रवास! हा शब्दचं जणू ऐकला तर आपल्या डोळयासमोर उभे राहतात अनेक रस्ते अनेक शहरे अनेक ठिकाणे प्रवासात आपण नवनवीन लोकांच्या संस्कृतीचे कला गुणांचे दर्शन करत असतो. असाच एक अनोखा प्रवास करण्याची संधी माझ्या आयुष्यात चालून आली ती आमच्या या वर्षीच्या स्टडी टूरच्या निमित्ताने अन ही संधी होती ती गोव्याची सफर करण्याची सहलीचा दिवस निश्चित झाला अन आम्हा सर्वांची एकच लगबग सुरु झाली. प्रत्येकजण सहलीला जाण्याच्या तयारीत गुंतले अखेरीस सर्वांची प्रतिक्षा संपली आणि आम्ही सर्व मित्र—मैत्रिणी आमचे पी.व्ही. पाटील सर धसके मॅडम व पाटील मॅडम सह सहलीसाठी २२ जानेवारीला रात्री दहा वाजता कॉलेजच्या परिसरात एकत्र झालो रात्री साडे दहा वाजता सर्व तयारीनिशी आमची सहलीच्या प्रवासाची सुरुवात झाली रात्रभर प्रत्येकजण गोव्याच्या ओढीने जागाच राहिला.

अखेरीस दहा तासांचा प्रवास व २०० कि.मी. अंतर पार करुन आम्ही गोव्याच्या रंगीन दुनियेत पाहोचलो गोव्यातील बेती येथे हॉलीडे व्हिलेज या हॉटेलमध्ये आम्हां सर्वांची राहण्याची उत्तम व्यवस्था सरांनी केली „होती. सकाळच्या सर्व प्राथमिक विधी आटोपून, नाष्टा करुन

आम्ही गोव्याच्या सफरीची सुरुवात केली पहिल्या दिवशी जुना गोवा पाहण्यास आम्ही गेलो गोव्यातील Basilica of Bom Jesus चर्च हे पहिले ठिकाण या पाहोचलो रात्री जेवण करुन खूप गप्पा मस्ती केली.

दुसऱ्या दिवशी पुन्हा पूर्ण तयारीनिशी नवीन गोवा पाहण्यासाठी सर्वजण निघालो. बसमधून जाताना घरातून आणलेल्या अनेक रुचकर पदार्थाचा आस्वाद घेत आम्ही गोव्याची राजधानी असलेल्या पणतीत खरेदीसाठी पाहोचलो. सर्वासोबत मिळून खरेदी केल्यावर पुन्हा आम्ही समुद्राची सफर करण्यासाठी बोटीत गेलो. डिजेवर डान्स करत बोटींग करताना आम्ही डॉल्फीन गुहागरचे सेन्ट्रल जेल अरेबियन समुद्र, हसीना मान जाएगी फिल्मचे फिल्म हाऊस पाहिले. दीड तास बोटींग करुन आमची सैर अग्वाद किल्यावरती पाहोचली. समुद्रकिनाऱ्यालगत असलेला अग्वाद किल्ला हा गोव्याच्या प्राचीन संस्कृतीचा वारसा दाखवत दिमाखात उभा आह. अग्वाद किल्ला हा दोन भागात विभागला असून वरील वास्तू व खालील तळात असलेली पाण्याची टाकी असे दोन भाग पाहवयास मिळतात. चारी बाजुनी मजबूत तटबंदी असून मध्यभागी मोठे पटांगण असलेला किल्ला आम्हांला गोव्याची ब्रिटीश कालीन संस्कृतीची ओळख करुन देत होता. अग्वाद किल्ला पाहून आम्ही कलंगुठ बीचवर पाहोचलो आमच्या सहलीतील गोव्यातील शेवटचे ठिकाण म्हणजे कलंगुठ बीचा हा गोव्यातील सर्वात मोठा व सर्वसोयीयुक्त असा किनारा आहे. या किनाऱ्यांवर चर्चला अनन्य साधारण महत्व असून अतिशय जुने चर्च आहे.तेथील धार्मिक व

शांततेच वातावरण प्रत्येकाच्या मनाला आत्मीक समाधान देऊ जाते चर्च जवळच असलेले पुरातत्व विभागाचे वस्तू संग्रहालयात आम्ही अनेक जुन्या व गोव्याच्या जीवन शैलीचे दर्शन घडवणाऱ्या वस्तू पाहिल्या पुढील ठिकाण होते मंगेश मंदीर गोव्यातील मंगेश मंदीर हे महादेवाचे मंदीर असून ते मंगेशंकर कुटुंबीयांच्या मालकीचे आहे. मंदीराचा परिसर हा नैसर्गिक सौदर्याने नटलेला आहे. मंदीराच्या आजूबाजूला अनेक खरेदीसाठी छोटी– छोटी दुकाने आहेत गोवा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या अनेक वस्तू तिथं भेटतात. दुपारचे जेवण करुन मंगेश मंदिरातून आम्ही आमच्या 'स्टडी टूर' च्या मुख्य उद्दिष्टाकडे वळलो ते म्हणजे गोवा युनिव्हर्सिटीत भारतातील एक महत्वाचे NIO सेंटर, देशातील ३७ CSIR लॅबमधील एक म्हणजे गोवा युनिव्हर्सिटी १ जानेवारी १९६६ रोजी या सेंटरची स्थापना झाली असून डोनापौला बीचवर अनेक सागरी संशोधन या संस्थेतून केले जातात. युनिव्हर्सिटीतून अत्यंत महत्वपूर्ण व अभ्यासपूरक माहिती घेऊन आम्ही डोनापौला बीचवरती पोहोचलो. अतिशय शांत हवेशीर वातावरणात सुर्यास्तावेळी या किनाऱ्यावरुन फिरताना मन आनंदाने न्हाऊन निघत होते. सर्व मित्रमैत्रिणीनी मिळून आम्ही खूप फोटो काढून त्या सुवर्णक्षणांना कैद केले. सनसेट पाहून परत आठवणींच्या साठयात अनेक क्षणांची भरती करुन आम्ही परत हॉटेलमध्ये सर्वांनी पाहोण्याचा पाण्यात पहुडण्याचा आनंद लुटला व सर मॅडम सोबत जणू आम्ही मित्र– मैत्रिणीसोबत जसे मस्ती मजा केली तशीच मजा या किनाऱ्यावर

आम्ही लुटली. सध्यांकाळी सनसेट पॉईट पाहून परत आम्ही मालवणच्या प्रवासास सुरुवात केली. जाताना बसमध्ये गाणी म्हणणे डान्स करणे. अनेक फनी गेम्स खेळत आम्ही मालवणमध्ये केव्हा पोहोचलो कळलेच नाही. रात्री साडे नऊ वाजता मालवणमध्ये मालवणी जेवणाचा आस्वाद घेऊन सर्वजण आपापल्या रुममध्ये दमून थकून झोपी गेले.

तिसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता नाष्टा करुन आम्ही चिवला बीचवर पाहोचलो. एकमेकांच्या हातात हात देऊन सागरी किनाऱ्यावर फिरण्याची मजा काय औरच होती. बीचवरुन पुढे आम्ही रॉक गार्डन मध्ये गेलो . रॉक गार्डन जणू कल्पनेच्याच दुनियेतील एक बागच! थोडा वेळ विश्रांती घेऊन आम्ही पुढे सिंधुदुर्गकडे रवाना झालो सिंधुदुर्ग हा सागरी दुर्ग पाहताना शिवाजी महाराजाच्या चतुराईला व बुद्धीकौशल्याला मन पुन्हा पुन्हा सलाम करत होते. गडावरील अनसेक वास्तू व दालने काळाच्या ओघात नष्ट झाली आहेत. गडावरील प्रत्येक गोष्ट पाहताना पाटील सरांनी आम्हांला गाईडन्स केले. या गडावर शिवराजेश्वर मंदीर भवानी मंदीर, मंदीरातील गुप्त भुयार शिवरायाच्या गनिमी काव्याची साक्ष देतात. दुपारचे जेवण घेऊन आम्ही पुढे कुणकेश्वरला निघालो. कुणकेश्वर हे अतिश भव्य असे महादेवाचे मंदिर "असून ते सागरी किनाऱ्यावरतीचे आहे. या मंदीराच्या परिसरात मन खूप शांत व प्रफुल्लित झाले. कुणकेश्वरला दर्शन घेऊन सर्वजणांची धौडदौड विजयदुर्गकडे निघाली. सहलीचे शेवटचे ठिकाण असलेला विजयदुर्ग हा सहा हेक्टर. क्षेत्रफळाची जमीन व्यापणारा जलदुर्ग आहे. विजयदुर्ग हा त्या दिवशी प्रजासत्ताक दिनाच्या निर्मित्ताने

नटलेला होता. गडावरील भव्य दिव्य अशा वास्तू डोळे दिपावणाऱ्या आहेत. विजयदुर्गची पाहणी करुन आम्ही परतीच्या प्रवासास सुरुवात केली. परतीच्यावेळी प्रत्येकजण पुन्हा पुन्हा भेट दिलेल्या ठिकाणांना साद घालत होते. प्रत्येकाची ही वेळ संपूच नये अशीच इच्छा होती पण वेळ संपली होती व शेवटची रात्र आम्ही खूप गप्पा व आठवणीत घालवली. २६ जानेवारीला पहाटे १ वाजता आम्ही कॉलेजच्या पटांगणात उतरलो प्रत्येकजण एकमेकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत होते. घरातून पालक येऊन सर्वांना सुखरुपपणे घेऊन जाताना आम्हां मित्र मैत्रिणीच्या औठावर फक्त एकच वाक्य होत.

'तीन दिवसांच्या या आठवणी आयुष्यभर राहतील मनी!'

सदर लेख मी स्वत: लिहीलेला असून कोणतेही चौर्यकर्म केलेले नाही

कु.पाटील मयुरी भूपाल
बी.एस्सी. भाग ३(गणित)

## माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ....

आयुष्य जगायचे असेल तर पाण्यासारखे जगा,
कुणाशीही मिळा मिसळा, एकरूप व्हा.
पण स्वत:च महत्त्व, कमी होऊ देऊ नका...!
जगाला काय आवडत ते करू नका,
तुम्हाला जे वाटतं ते करा,
कदाचित उदया तुमचं वाटणं जगाची आवड बनेल.

प्रत्येकाच्या आयुष्यात असा एखादा तरी प्रसंग असतोच जो आपण कधीच विसरू शकत नाही. माझ्याही आयुष्यात असे बरेच प्रसंग आहेत. आयुष्यातील हे मोजके क्षण अशा काही आठवणी देऊन जातात ना आपण त्या आठवणी विसरायच्या म्हटलं तरी विसरू शकत नाही. खरोखरच जीवनाचा आनंद घ्यायचा असेल तर फक्त सुख असून भागत नाही तर दु:ख असणंही अत्यंत गरजेचे आहे. थोडया चांगल्या, थोडया वाईट अशा गोष्टींनीच तर आयुष्य बनतं. गोड आठवणीही कधी कधी डोळयातून पाणी आणतात. अशाच गोड

आठवणीत आमचं बी. ए. भाग ३ चं वर्ष सरलं आणि त्याच वर्षात घडलेला गोड प्रसंग म्हणजे आमचा बी. ए. भाग ३ चा पारंपारिक दिवस.

पारंपारिक दिवसाचं नियोजन करणं तसं थोडं अवघडच गेलं, त्याला कारणही तसच होतं. झालं असं की, पहिल्या सत्रात बऱ्याच दिवस सुट्टी मिळाल्यामुळे दुसऱ्या सत्रात वेळेचा अभाव होता. त्यात भर म्हणून त्याच आठवडयात सहलीचही नियोजन चालू होतं. मी सहलीला जाणार नाही हे पक्कं होतं. त्यामुळे जी काय मजा करायची ती पारंपारिक दिवस साजरा करणार होतो, त्याच दिवशी करायची होती. एकतर आमच्या वर्गातील मुली आधीच साडी नेसायला नाही म्हणत होत्या. पण मला पारंपारिक दिवस साजरा करायचाच होता. मग त्यासाठी काहीही करावं लागलं तर माझी तयारी होती. विषय असा होता की, एकमताने कोणताच निर्णय होत नव्हता आणि प्रत्येकाचे मत ऐकणे पण आवश्यक होते. बऱ्यापैकी मुली तयार झाल्या पण काही मुली तयारच होईनात. मग काय Emotional Blackmailing सुरू केलं. जसं की, अरे ह तर आपला शेवटचाच कार्यक्रम आहे. पुढच्या वर्षी आपल्याला करा म्हणून सांगायला कोणी येणार आहे का? आणि तसही आपलं कॉलेज पण तर संपत आलं आहे. एवढं सगळं केल्यावर कुठं राहिलेल्या मुली पण तयार झाल्या. मुलांना तयार करण्याची जबाबदारी एकावर सोपवून आम्ही मोकळे झालो. कार्यक्रम

साजरा करायला सगळी तयार झाली खरी पण आता नियोजनाचे काय हा प्रश्न उभा राहिला. सगळी सुत्र आमच्या हाती असल्यामुळे नियोजनही आमच्याकडेच होते.

आमच्या गणित विभागाचा वेगळा असा पारंपारिक दिवस साजरा करायचा असं ठरवलं होतं. पण प्राचार्य सरांनी परवानगी नाकारल्यामुळे सर्वांसोबत १४ जानेवारीलाच कार्यक्रम करायचं ठरलं. त्या दिवशी अभ्यास तर काही करणारच नव्हतो. आता प्रश्न असा होता की, दिवसभर करायचं तरी काय? बऱ्याच खेळाचं नियोजन केलं जसं की, दम — शरारत, जर — तर, स्मरणचुरस आणि महत्त्वाचं म्हणजे या सगळयात आमच्या शिक्षकांचाही समावेश होता. काहीतरी वेगळं असावं म्हणून त्या दिवशी पूर्ण मॅथ्स् विभागाने फेटे घालायचे ठरविले.

ते म्हणतात ना, "अखंड यशाने आपल्या जीवनाची केवळ एकच बाजू कळते. दुसरी बाजू कळण्यासाठी अपयशाची गरज असते". याआधी म्हणजे बी.ए. भाग २ मध्ये मी आणि माझ्या मैत्रिणींनी असाच पारंपारिक दिवस साजरा करायचा बेत आखला होता. पूर्ण तयारी सुद्धा केली होती. पण हवा तसा प्रतिसादच मिळाला नाही. सगळा बेत फसला होता. तेंव्हा जे झालं, तेच आत्ता पण होईल का अशी जरा धाकधूक चालू होती. नियोजन करून त्याप्रमाणे झाल नाहीं ना तर खूप वाईट वाटतं. त्यामुळे यावेळी थोडं टेन्शनमध्येच कार्यक्रमाचे नियोजन केल. माझं तर ठरलं की, जायचं

तर कोल्हापुरी पोशाखातच जायचं. आयुष्यात आजपर्यंत कधीही साडी नेसले नव्हते, त्यामुळे थोडं अवघड जाणार हे माहीत होतेच. तरीही खूप मनापासून इच्छा होती की एकदा तरी कोल्हापुरी वेष परिधान करावा.

नाकात नथ, नऊवारी, साडी, कमरपट्टा, बाजूबंद, चंद्रकोर टिकली, अंबाडा त्यासोबतच गजरा, हिरव्या बांगडया, गळयात टिका आणि लक्ष्मीहार, पैंजण, पायात कोल्हापुरी चप्पल अशा पोशाखात कॉलेजमध्ये पोहोचले. विशेष म्हणजे माझ्यासोबत अजून दोघीजणीही कासूटा घालून आल्या होत्या, खरं तर त्या दिवशी इतक आवरलं होतं की, माझं लग्न आहे की काय असच वाटत होतं. पण तसं काही नव्हतं हा.. सर्वांकडून खूप छान छान प्रतिक्रिया आल्या. सगळेजण खूपन वेगवेगळं काही करून आले होते. हा क्षण अविस्मरणीय यासाठी होता, कारण आज पहिल्यांदा आम्ही सगळे मुले — मुली एकत्र येऊन हा कार्यक्रम करत होतो. या दिवसानंतर खरं तर वर्गातील सर्वांशी ओळख झाली. हा दिवस आठवणीत राहण्याचं अजून एक कारण असं की, नियोजनाप्रमाणे या दिवशी काहीच घडले नाही, निम्मा वेळ फेटे घालण्यात गेला. त्यानंतर फोटो काढण्याचा कार्यक्रम झाला. यात बराच वेळ गेल्यावर भूक लागल्याने सर्वजण दाभेलीवर तुटून पडलो, थोडा वेळ खेळ खेळलो आणि दिवसच संपला. हा असा पहिला पारंपारिक दिवस होता ज्यात माझे भाऊ अभिजीत, अमोल,

जयदिप आणि मैत्रीण पिया आम्ही सगळे एकत्र होतो आणि वाईट पण वाटत होतं. कारण माझी अजून एक मैत्रीण पूनम आमच्या सोबत नव्हती. त्यादिवशी तिची खूप आठवण काढली.

आपण आपलं पूर्ण जीवन कुटुंबाच्या सान्निध्यात घालवितो. कुटुंबासोबत घालविलेले क्षण अविस्मरणीय असतातच. पण मित्रमैत्रीणींसोबत आपण काही क्षणच घालवितो आणि दोस्त आपल्या आयुष्याचा अविभाज्य घटक बनून जातात. ते म्हणतात ना, "मीठाविना जेवण जसं बेचव लागतं त्याप्रमाणे मित्रांशिवाय आयुष्य निरस आहे".

मैत्री अशी असावी,

भरकटलेल्या पाखराला घराची वाट दाखवणारी,

सुकलेल्या फुलांना बहर आणणारी,

दु:खाच्या वाळवंटात प्रेमाचा पाझर आणणारी,

एकटेपणात सहवासाचा दिलासा देणारी,

शब्दाविना सर्व काही समजून घेणारी,

न सांगताच डोळयातील भाव ओळखणरी.

असं नाही की, फक्त आमच्या विभागासोबतच पारंपारिक दिवस साजरा केला. आमच्या पूर्ण बॅच सोबत हा दिवस साजरा केला.

मित्रमैत्रिणींसोबत घालविलेला हा क्षण मला माझ्या आयुष्याचा शेवटपर्यंत आठवणीत राहील. थोडं वाईट पण वाटतंय की आता काही दिवसानंतर आम्ही सोबत नसणार. पण कुठेही गेलो तरीही एकमेकांच्या संपर्कात राहू.

हे माझ्या सर्व प्रिय दोस्तांसाठी,
अपनी यारी ऐसी हो जैसे
आंसू तेरे हो, तो आंखे मेरी हो.
दिल तेरा हो, तो धडकन मेरी हो,
इतनी गेहरी हो, दोस्ती तेरी मेरी,

सुवर्णा (स्वर्णा) महादेव कदम
बी.एस्सी. भाग २

## माझा अविस्मरणीय प्रसंग

प्रसिध्द लेखक 'कृष्णमेध कुंटे' यांनी म्हणलेलं अगदी खरेच आहे. 'आठवणी साठवून ठेवायला माणसाच्या स्म्रणशक्ती एवढं प्रभावी दुसर साधन नाही. कॅमेरा क्षणार्धात दृश्य पकडतो पण त्यातून तो क्षण निसटला की कायमचा निसटतो, मात्र काही क्षण डोक्यात पक्के बसतात अँगदी कायमचे अविस्मरणीय बनून.' अशीच आहे माझी एक शालेय जीवनातील अमुल्य आठवण, माझ्या स्मरणशक्तीमध्ये घर करुन बसलेली माझ्यासाठी प्रेरणादायी असा, प्रोत्साहन देणारा आणि माझ्यावर असणाऱ्या जबाबदारीची आठवण करुन देणारा प्रसंग, माझा अविस्मरणीय प्रसंग, मला मिळालेला 'आदर्श' विद्यार्थिनी, सन्मान, बहुमान, शाळेच्या इतिहासात लिहून ठेवलेला आणि तो मला परत कधीही पहायला मिळेल असा माझा अविस्मरणीय प्रसंग.

मी चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदीर, तासगांवची माजी विद्यार्थीनी आमच्या शाळेत दरवर्षी आदर्श विद्यार्थी आणि आदर्श विद्यार्थीनी हा सन्मान दिला जातो. यासाठी दहावीच्या विद्यार्थीनी १ ली ते १० वी मिळवलेलं यश , व्यक्तिमत्व विकास, सामाजिक जाणीव, सामान्य ज्ञान आणि बहरहुन्नरीपणा पडताळणारी एक मुलाखत घेतली जाते आणि

ज्यात ज्या मुलीला आणि मुलाला सर्वाधिक गुण मिळतील ती आणि ती 'आदर्श' म्हणून निवडले जातात आणि शाळेच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाला त्यांना सन्मानित केलं जातं. हा सन्मान इतर सगळया पारितोषिकांपेक्षा उच्च असतो म्हणून त्यांची शाळेच्या रेकॉर्डमध्ये नोंद ठेवली जाते.

सन २०१२ – १३ माझं दहावीचं वर्ष डिसेंबर महिन्यात वर्गात सूचना आली 'ज्या कोणाला आदर्श विद्यार्थी पुरस्कार यासाठी अर्ज करायचे आहेत त्यांनी दोन दिवसांत अर्ज श्री. जोग सरांकडे जमा करावेत व नंतर अर्जाची छाननी व निवड करुन मुलाखतीसाठी नावांची यादी लावली जाईल. सुचना ऐकली आणि मला वाटलं 'हे...... आपण थोडीच होणार आहे आदर्श विद्यार्थीनी!' माझ्याजवळ आत्मविश्वास थोडा कमीच होता. असुदे म्हणलं घरीतर सांगुया अशी अशी सुचना आली आहे म्हणून मग घरात सर्वासमक्ष विषय काढला आणि विचारलं,

''मी अर्ज करु की नको?'' यावर मला चिडवून द्यायला दादानं सल्ला दिला, ''तुझ्यासारख्या भांडखोर मुलीला कोण देणार आहे आदर्श विद्यार्थीनी पुरस्कार? पण असु दे कर अर्ज इंटरव्हयू कशी असते ते तरी कळेल.'' मला खूप राग आला मी पण चिडून उगाचच पण जरा गर्वानेच उत्तर दिलं, ''बघ हं, आणि मिळालं तर काय करणार ?'' यावर तो म्हणाला, ''आधी मिळवून दाखव, मग मी माझी तुला दिलेली 'भांडखोर' ही पदवी परत घेतो.'' मला राग तर खुप

आला होता. वाटत होतं 'नकटं असाव पण धाकट असू नये' रोज एक नवीन उपाधी काही तरी. मी पण ठरवलंच आता याला दाखवायचचं, मी काय आहे ते 'भांडखोर' की आदर्श.'

मी पप्पांना विचारलं, अर्ज करु की नको यावर पप्पांनी एकच उत्तर दिलं, ''तुझं तूच ठरव.'' आणि मला आठवलं मी आठवीत असताना माझ्या दिदिची मैत्रीण आदर्श विद्यार्थीनी झाली होती तेव्हा पप्पा मला म्हणाले होते. ''आणखी दोन वर्षानी कोण असणार आहे माहित आहे का आदर्श विद्यार्थीनी?'' मी विचारलं, ''कोण?'' तेव्हा पप्पा काहीच बोलले नाहीत. मी ठरवलं मी पप्पांची ही इच्छा नक्की पुर्ण करणारचं, आणि माझ्यात आत्मविश्वास आला.

मी अर्ज केला. आता प्रश्न होता अर्जाची निवड होईलच की नाही आणि झाली तर मुलाखत मुलाखतीसाठी मी जनरल नॉलेज आणि वेगवेगळया प्रश्नांवर, विषयांवर माहिती मिळवायला सुरुवात केली आणि सुदैवानं मुलाखतीसाठी निवड झाली. मुलखतीचा दिवस उजाडला. एखाद्या पाच अंकी पगाराच्या नोकरीच्या मुलाखतीला चालल्यासारखं, कडक इस्त्रीचे कपडे, एका हातात फाईल, आणि आत्तापर्यंत मिळवलेले शील्ड सोबत आणायला सांगितले असल्यामुळे एका हातात ७–८ शील्ड असणारी कॅरीबॅग घेवून सज्ज झाले. भीती तर खूप वाटत होती. धडधडायला सुरुवात झाली होती. काय प्रश्न विचारतील?, मला उत्तर देता येतील ना? खूप प्रश्न पडत होते.

तेवढयात माझं नाव घेतल व मला आत बोलावलं मला अचानक पोटात गोळा आल्यासारखं झालं मग एक दिर्घ श्वास घेतला आणि रुममध्ये आत जायला निघाले. दरवाजातून आत येण्याची परवानगी घेवून आतमध्ये गेले.

आमच्याच शाळेतील पाच–सहा शिक्षक असल्यामुळे मला जरा धीर आला. सर्व शिक्षण अर्धवर्तुळाकार अशा मांडणीमध्ये बसले होते. टेबलसमोर मधोमध एक खुर्ची ठेवली होती मी खुर्चीजवळ जावून उभी राहिले. मग एका सरांनी बसायला सांगितले दुपारची वेळ होती त्यामुळे सर्वांना Good Afternoon म्हणाले व फाईल टेबलवर ठेवली नंतर शील्डसुध्दा ओळीनं मांडली पहिला दुसरा प्रश्न मला नाव व पत्ता विचारला उत्तर दिल्यानंतर लगेच दुसरा प्रश्न विचारला, ''आपल्या सांगली शिक्षण संस्थेची, स्थापना कोणी केली?'' ५ वी पासून १० वी पर्यत प्रत्येक कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेत चार शिक्षक व एक विद्यार्थी' अशी स्थापना झालेली संस्था असा उल्लेख केला जायचा त्यामुळे मला त्या चारही शिक्षकांची, संस्थापकांची नावे माहित होती. मी पटकन उत्तर दिलं, ''गुरुनाथ तोरो, विनायक जोशी, राजाराम चिकोडीकर, धोंडी सखदेव.'' क्षणाचासुध्दा विलंब न लावता मला पुढचा प्रश्न विचारला, ''आपल्या शाळेची स्थापना कधी झाली?'' प्रश्न ऐकला आणि माझ्या मनात गोंधळ सुरु झाला ६ जून का १६ जून, मग तरीही उत्तर दिलं ''१६ जून १९२० सरांनी विचारंल नक्की १६ जून?'' मी म्हणाले, ''सर मी ६ जून का १६ जून म्हणून Confuse आहे पण नक्की १६ जून'' सरांनी मला मागं वळून बघायला

सांगितलं, माझ्यामागे मी जेथून आत आले तो दरवाजा होता आणि समोरच्या भिंतीवर शाळेच्या स्थापनेची तारीख लिहिलेली होती माझा Over Confidence चुकीचा ठरला होता मी पटकन म्हणाले, "Sorry सर ६ जून १९२०" माझं सुरुवातीचंच उत्तर, महत्वाच उत्तर चुकल होतं त्यामुळे मनात चलबिचल चालली होती पण मी चेहऱ्यांवर दिसू दिलं नाही.

पुढचा प्रश्न मला " स्पर्धा परिक्षा कोणत्या दिल्या होत्या का? " हा विचारला मी स्कॉलरशिप, टी. एस. ई इलेमेंटरी, इंटरमिजिएट आणि संस्कृतच्या दोन परिक्षा दिल्या होत्या मला स्कॉलरशिप टी.एस.ई ला फारसे चांगले मार्क नव्हते पण संस्कृतच्या दोन्हा परिक्षांमध्ये १०० पैकी ९० व ९३ मार्क मिळवून नंबरात आले होते. इलेमेंटरी आणि इंटरमिजिएटला सुध्दा शाळेत सर्वात चांगली ग्रेड मलाच होती मी परिक्षांची नावे सांगितली एका सरांनी सर्टिफिकेट पाहिली.

नंतर मला " भारताचे राष्ट्रपती व उपराष्ट्रपती कोण आहेत?" असा प्रश्न विचारला राष्ट्रपती तर माहितच होते उपराष्ट्रपसती कोण आहे हे मी आदल्याच दिवशी माहिती करुन घेतली होती. त्यामुळे मी उत्तर दिलं, "राष्ट्रपती प्रणव मुखर्जी व उपराष्ट्रपती महम्मद अन्सारी हे आहेत." एका पाठोपाठ एक प्रश्नांचा माझ्यावर भडिमार सुरु होता काहीची उत्तर मला देता येत नव्हती मग मी ," Sorry सर मला याच उत्तर माहित नाही किंवा येत नाही, अस सांगत होते.

"तासगांवच्या जवळची नदी कोणती? तासगांव कशासाठी प्रसिध्द आहे? गणपती मंदिराच्या गोपूराची उंची किती आहे? तासगांवचे राजे कोण होते, तासगावचे पहिल हायस्कुल कोणतं? असे बरेच प्रश्न मला विचारले जात होते आणि मी उत्तर देत होते. पुढचा प्रश्न मला बराच विचार करायला लावणारा होता. "भ्रमणध्वनीवर अंधांना ओळखता येण्यासाठी कोणता कमांक असतो?" या प्रश्नानं मला खर विचारात पाडलं सर म्हणाले "आठव, विचार करुन उत्तर दे" मी थोडावेळ विचार केला आणि उत्तर दिल, "पाच , पाच कमांक असणाऱ्या बटणावर काहीतरी खूण असते." माझ उत्तर बरोबर होतं स्किनटच मोबाईलचं मला माहित नाही पण बटणांच्या मोबाईलला पाच अंकावर थोडासा उंचवटा, डॅश, वगैरे काहीतरी खूण असतेच.

मुलाखल रंगात आली होती. यानंतर मला बरेच प्रश्न विचारले गेले "भारताचे पहिले प्रधानमंत्री कोण? पहिली नोबेल पुरस्कार विजेती महिला कोण? पहिली महिला शिक्षिका कोण? विधानसभेची किती सदस्य असतात?" मी माहित असणाऱ्या प्रश्नांची उत्तर देत होते आणि लगेचच पुढचा प्रश्न विचारला जायचा पुढचा प्रश्न मला विचारला "राज्यसभेचे अध्यक्ष कोण?" मी आठवण्याचा प्रयन्त करु लागले पण मला आठवेना. मी काही बोलायच्या आत सरांनी विचारलं "कोण असतं?" मी आठवू लागले राज्यसभेचे अध्यक्ष ...... राज्यसभेचे अध्यक्ष..... आठवलं आणि चटकन उत्तर दिलं

''उपराष्ट्रपती, महम्मद हमीद अन्सारी हे राज्यसभेचे अध्यक्ष आहेत.'' ''राष्ट्रपतीच्या गाडीची नंबर किती अंकी असतो?'' या प्रश्नाचं उत्तर मी देवू शकले नाही.

नतर मला माझा खेळांमधला सहभाग विचारला मी वैयक्ति खेळात एक दोनच बक्षीस मिळवली होती पण सांघिक खेळात दरवर्षी वर्गाची कॅप्टन, उपकॅप्टन असायचे आणि आमची टिम जिंकायची सुध्दा मी माझा खेळातला सहभाग सांगितला यानंतर मला ''आवडते छंद कोणते?'' हा प्रश्न विचारला हा प्रश्न माझा सगळयात आवडीचा होता कारण माझ्या छंदाची माझ्याकडं लिस्टच होती. मी सुरुवातीला ''मला कविता व लेख लिहायला आवडतात'' अस सांगितलं ''तुझे आवडते कवी कोण?'' मला विचारलं ''कुसमाग्रज'' मी उत्तर दिलं मला त्याचं पुर्ण नांव, त्यांना मिळालेले पुरस्कार विचारले. महाराष्ट्रातील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कोण कोण व किती साहित्यिक आहेत, परत त्यांची नावं, टोपणानांव वगैरे विचारली. मला साहित्याची आवड होती त्यामुळे मी बरोबर उत्तर देवू शकले. नंतर मला ''सांगली जिल्हयातील एका लेखक किंवा लेखिकेच नाव सांग'' असं सांगितल मला हे माहित नव्हत त्याचक्षणी मला मराठीच्या सरांचा तास आठवला, एका लेखिकेचा परिचय करुन देताना सरांनी या लेखिका दुसऱ्या एका सरांच नाव सांगुन त्यांच्या गावच्या आहेत अस सांगितल होतं मी लगेच उत्तर दिलं, ''काशिबाई कानिटकर, सांगली जिल्हयातील अष्टे या गावच्या त्या होत्या'' नंतर मला, ''तुझे लेख कविता कुठे प्रकाशित झाल्या होत्या का?'' विचारले माझ्या कविता सलग तीन

वर्षे संस्थेच्या वार्षिक अंकात प्रकाशित झाल्या होत्या, एक वर्ष लेखसुध्दा प्रकाशित झाला होता मी तसं सांगितलं पुढे "आणखी कोणकोणते छंद आहेत?" मी माझ्या अर्जामध्ये बरेच छंद लिहिले असल्यामुळे परत तोच प्रश्न विचारला मी, पुस्तके वाचणे,जुनी वेगवेगळी नाणी, नोटा गोळा करणे, चित्रकला हे छंद सांगितले त्यानंतर वाचलेल्या पुस्तकाची नावं लेखक कोण ते सांगितले, माझ्या संग्रहातली सोबत नेलेली अरब, अमेरिकेच एक एक नाणं आणि भूतानच्या नोटा मी आवर्जून दाखवल्या चित्रकेलेत तर मला शालेय, शालाबाह्य बरीच बक्षीस होती श्री. गणेश चॅरीटेबल ट्रस्ट तासगांव याच्या गुरुवर्य दा.रा. जोगळेकर स्मृती पितर्थ झालेल्या बालचित्रकला स्पर्धेचा 'दारा पुरस्कार' मिळाला होता त्याबद्दल आणि मी इतर बक्षीस मिळवलेल्या स्पर्धाबद्दल माहिती दिली. त्यानंतर मला बौध्दिक स्पर्धाचा सहभाग विचारला मी वक्तृत्व, कथाकथन,निबंध स्पर्धेतील मिळवलेले नंबर व सहभाग सांगितला.

परत मला एक प्रश्न विचारला "ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कोणत्या साहित्यिकांनसी आपल्या शाळैत शिक्षक म्हणूनसेवा केली होती?" हा प्रश्न ऐकला आणि मी आश्चर्यचकीत झाले. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त शिक्षक माझ्या शाळेत आणि मला माहितीसुध्दा नाही. मला सॉरी सर मला माहित नाही, असंच उत्तर दयावं लागलं या उत्तरानंतर सगळया शिक्षकांनी एकमेकांकडे पाहिलं बहुदा सर्वाचे प्रश्न झाले का या विचारानं पाहिलं असावं पण मी मात्र घाबरले मनातल्या

मनात म्हणाले 'दादाला दिलेलं चॅलेज विसरा आता' तेवढयात एका सरांनी पुढचा प्रश्न विचारला तो प्रश्न आधी एकदा वर्गात विचारलेला त्याच उत्तर मी आणि माझी मैत्रिण दोघीनींच फक्त 'हो' अस उत्तर दिलं होतं मला विचारलं, ''तुला स्वयंपाक येतो का?'' या प्रश्नामुळे मी मनातून सरांवर जाम खुश झाले आणि मी 'हो' अस उत्तर दिले. दुसऱ्या सरांनी लगेच विचारलं, ''सगळा येतो का?'' हा प्रश्न विचारायचं कारण मला कळालं, कारण माझ्याआधी मुलाखत झालेल्या एक मुलीनं उत्तर दिलं होत, स्वयंपाक येत नाही पण आई गावाला गेल्यावर मॅगी बनवून खाते, सरांच्या त्या प्रश्नावरुन मला तिचं ते उत्तर आठवलं मी सांगितलं, ''मला नॉनव्हेज सोडून सगळा स्वयंपाक येतो.'' पहिल्या सरांनी परत आवर्जून विचारलं, ''भाकरी येतात का?'' मी तर भाकरीच नुकतीच एक्सपर्ट झाले होते आणि घरात माझ्या चपात्यापेक्षा माझ्या भाकऱ्याचंच कौतुक जास्त होत होती, त्यामुळे मी, हो सर येतात मला भाकरी असं सांगितलं यावर एकदा सर म्हणाले,'' बघ हं सुवर्णा, मी येणार तुझ्या घरी खास तुझ्या हातच्या भाकरी खायला,'' सरांचं बोलणं ऐकूण सगळेच हसायला लागले मीही पटकन म्हणाले,'' हो सर नक्की या सगळेच या मी वाट पाहीन.'' सर्वजन हसून हो येतो म्हणाले मला तुझी मुलाखज झाली आहे तू जावू शकतेस असे सांगितले मी 'थॅक्यू सर' म्हणाले आणि उठून उभा राहिले.

माझी मुलाखत सुरु होवून अर्धा तास होवून गेला होता. मी सोबत नेलेली शील्ड कॅरीबॅगमध्ये घालत घालत म्हणाले ''सर मी

एक प्रश्न विचारु शकते का?'' सर हा विचारु शकते' म्हणाले आणि मला परवानगी मिळाली मग मी विचारलं,'' मला ५ वी ते १० वी ऐकण्यात नाही किंवा ऐकलं असेल तरी लक्षात नाही सर आपल्या शाळेत ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त शिक्षक कोण होते?'' सरांनी लगेच सांगितलं ''विंदा करंदीकर हे सुरुवातीला काही महिने आपल्या शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करत होते.'' उत्तर ऐकून मी खूप आश्चर्यचकीत झाले आणि खूप खुशसुध्दा झाले. मी थॅक्यू सर म्हणून रुमच्या बाहेर आले.

माझी माझ्या आयुष्यातली पहिली मुलाखत संपली होती. मला बऱ्याचशा प्रश्नांची उत्तर देता आली नव्हती माझ्या प्रतिस्पर्धी सगळया माझ्यापेक्षा अभ्यासात हुशार होत्या आणि त्यांच्या सांगण्यावरुन त्याच्यासारखी चांगली उत्तरसुध्दा मला देता आली नव्हती त्यामुळे मी आदर्श विद्यार्थीनी होण शक्यच नाही अस मला वाटत होत. तरीपण मी वेडी आशा ठेवली होती. ग्राऊंडवर प्रार्थनेसाठी पुर्ण शाळा जमली होती प्रार्थना झाली. आता निकाल सांगणार होते मी क्षणात मागे वळून पाहिल आणि आमच्या शाळेच्या प्रांगणातून दिसाणाऱ्या गणेशाचं मंदिराच्या गोपूराच दर्शन घेतलं सुरुवातीला मुलांचा निकाल जाहीर केला. आमच्याच तुकडीतला मुलगा शाळेचा आदर्श विद्यार्थी झाला होता. आता मुलींचा निकाल सांगणार होते मागे ओळीत मुली मला म्हणत होयता पार्टी पाहिजे बर का. मी त्यांना सांगत होत, ''अगं मला सगळी उत्तर देता आली नाहीत, मी कशी होईन आदर्श

विद्यार्थीनी? गप्प बसा अन् पुढचं एका आधी," मी त्याना गप्प केलं पण मला मात्र धडधडायला सुरुवात झाली होती पुढं माईकवर मुख्याध्यापक सर म्हणाले सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाची आदर्श विद्यार्थीनी आहे......." मी पुढचं वाक्य ऐकण्यासाठी सरांच्या शब्दांबरोबर श्वास रोखून ठेवला होता सर पुढं म्हणाले," आपल्या शाळेची....., दहावी 'ब' ची अष्टपैलू विद्यार्थीनी.... आणि आदर्श विद्यार्थीनी सुवर्णा महादेव कदम," टाळयांचा कडकडाट सुरु झाला होता. मला तर कळायचंच बंद झालं होतं माझं नाव घेतलं होतं डोळे पाण्याने भरले होते मागनं जोरात मला धक्का देत मैत्रीण म्हणाली, अगं जा समोर पार्टी पक्की मी समोर गेले तरी माझा विश्वासच बसत नव्हता उभे असलेले पुर्ण शाळेचे मुलं- मुली बघून मला मी पाचवीत असतानाचं आठवलं तेव्हाची आदर्श विद्यार्थीनी नेहा कुलकर्णी तिचं कौतुक बघून मी तेव्हाच ठरवलं होत एक दिवस मी सुध्दा अशीच पुढं जाणार कौतुकाची थाप पाठीवर घेण्यासाठी मुख्याध्यापकांनी आम्हां दोघांच कौतुक केलं व म्हणाले," शाळेच नाव मोठं करा, नेहमी आदर्शच राहण्याचा प्रयत्न करा," मी 'हो' म्हणाले आणि काहीतरी खूप मोठी जबाबदारी माझ्यावर असल्यासारखी जाणीव झाली प्रार्थना झाल्यावर सर्व शिक्षक, मैत्रिणीकडून अभिनंदनाचा वर्षाव सुरु झाला.

मला तर कधी एकदा घरी जाईन मम्मी पप्पांना सरप्राईज देईन झालं होतं दादाकडुन 'भांडखोर' पदवी बदलून घ्यायची होती. मी घरी गेले आणि सर्वांना माझं सरप्राईज सांगितलं मम्मी पप्पांच्या

डोळयांत आनंदाश्रू आले होते. मम्मीनं मला पटकन साखर चारली मी दादाला म्हणाले, ''सांग दादा, 'भांडखोर' की आदर्श त्यावर तो म्हणाला, ''तू आहेस...... आदर्श......भांडखोर! मी चिडून म्हणाले, ''पप्पा सांगा की त्याला.'' तेव्हा पप्पा म्हणाले,'' तु आदर्श विद्यार्थीनी तर झालीसच पण त्याआधी तु माझी आदर्श मुलगी आहेत.'' हे वाक्य ऐकून मला खूप छान वाटलं हे वाक्य मला नेहमी पाळयचं आहे आई— वडीलांच आणि शाळेचं नाव मोठं करायच आहे त्यासाठी मी सदैव प्रयत्न करीन.

दुसऱ्या दिवशी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे शाळेचे १९८८—८९ सालचे माजी आदर्श विद्यार्थी आणि विद्यार्थीनी त्यांच्या हस्ते माझा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते म्हणाले,'' असंच एक दिवस तुला सुध्दा परत यायंच आहे,'' मी तो दिवस कधीच विसरु शकत नाही कारण माझ्या पप्पांची इच्छा आणि माझ पैहिलं ध्येय पुर्ण झालं होतं.

अशी माझी पहिली मुलाखत, पहिलं ध्येय, आणि पप्पांची इच्छा पूर्ण करणारा 'आदर्श विद्यार्थीनी, सन्मान हा माझ्यासाठी नेहमीसाठी अविस्मरणीय प्रसंग बनला. मला जबाबदारीची जाणीव करुन देणारा, पुढची ध्येय गाठण्यासाठी, स्वप्न साकारण्यासाठी नेहमी प्रोत्साहित करणारा, मला नवऊर्जा देणारा असा माझा अविस्मरणीय प्रसंग मनाच्या घरात उच्चस्थानी विराजलेला, आणि शाळेच्या इतिहासात नोंदवलेला माझा अविस्मरणीय प्रसंग, माझ्या आयुष्यात मला अविस्मरणीयच आहे.

कु. स्नेहल तानाजी चव्हाण
बी.एस्सी.भाग – ३ (संख्या)

## ★ पंजाबी कुर्ता ★

उन्हाळयाची सट्टी लागली होती. मी नुकतीच सातवीची परीक्षा दिली होती. एक दिवस आईनं कपडे खरेदीला जायचं आहे असं सांगितलं. पण विशेषकरून ती मलाच फक्त खरेदीला घेऊन जाणार असल्यामुळे मी खूपच खूष होते. माझ्या दोन्ही बहिणी घरीच राहणार होत्या. पण मी, आई–बाबा कपडयाच्या दुकानात गेलो तेव्हा आईनं माझ्या मापाचा पंजाबी कुरता दुकानदाराला दाखवायला सांगितले. मला वाटले माझ्या बहिणींसाठी असतील म्हणून मी गप्प बसले. पण खरेदी संपेपर्यंत आई एकदाही पॅन्ट–शर्ट दाखवा म्हणेना. तेव्हा मला खूप राग आला. मग मीच दुकानदाराला पॅन्ट–शर्ट दाखवण्याबद्दल बोलेले, तर आईनं एकाच वाक्यात सांगितलं 'आतापासून मुलीनी पंजाबी कुरता घालयाचा. यापुढे पॅन्ट–शर्ट मिळणार नाही. मला धडकीच भरली, रडायलाही आलं. आईचा रागपण आला. पण बाब बरोबर होतो. त्यांच्यापुढे बोलणं मला कधी जमलंच नव्हंत. कारण बाबांची खूप भिती वाटायची. मी गप्प बसले. आजपर्यंत कधीच मुलींचा कुरता घातला नव्हता. कायम मुलांचेच शर्ट–पॅन्ट वापरायचे. कारण मला तेच कपडे आवडायचे. आजपर्यंत कधी आई बोलली नाही पण आजच अशी का वागते ते समजत नव्हतं?

परत आम्हाला घरी सोडून बाबा बाहेर गेले. आणि माझा संयम संपला अन् मी मोठयांन रडायला सुरवात केलं. माझे दोन्ही काका, काकू, आजी सगळे गोळा झाले. माझे लहान काका म्हणाले, ''तुझ्या वर्गात एक तरी मुलगी मुलांसारखं शर्ट—पॅन्ट घालतेय का? मग तूच त्यांच्यापेक्षा वेगळे कपडे का वापरतेस,

त्यांच्यासारखं पंजाबी कुरता घालं''. तेवढयात मोठे काका म्हणाले, ''पोरींनी असं पारोसारखं कपडं घालणं बरोबर दिसत नाही.'' ''ज्यांचं त्यांच केलय कशाला?'' तर माझ्या दोन्ही काकांच म्हणणं होते, ''आता तू मोठी झालीयसं, आता पोरींचीच कपडे घालायचे अजुन किती दिवस पोरांसारखं छोटे केस कापून, शर्ट—पॅन्ट घालणार तू? तर आजी म्हणत होती, ''आई—बानं लई लाडवून ठेवल्या म्हणून असं करत्या. मागल ती मिळतंय म्हणून असं हुतयं. पण पायातली चप्पल पायातच ठेवायची. असल्या पोरीच्या जातीनं एवढा तोरा करायचा नसतुया, गपगुमानं ही कापडं घालायची, ''पण मला कोणाचचं पटत नव्हतं. माझं रडणं चालूच होतं. आईनं तर दुसरी कपडे घेणार नाही आणि आहेत ती शर्ट—पॅन्ट शेजारच्या पोरांना देऊन टाकण्याची धमकी दिली होती. त्यानंतर तर मी पंजाबी कुरता घालेन हा तिचा कयास. पण तिच्या निर्णयानंतर मी आणखी मोठयाानं रडायला चालु केलं. पण थोडयाचं वेळात गाडीच्या आवाजावरून बाबा आल्याचं कळतांच माझा आवाज कमी झाला. पण मुसमुसणं चालूचं होतं. पण बाबा येताच आजीचा आवाज वाढला होता, ती म्हणत होती, '' शेजारची

कमला म्हणतीय काय न्हाय तीचं तुम्ही लाड लावलायसा, ''कुठं पोरींनी पॅन्ट घालायची असत्या. बघ जावा सगळं गाव तुमच्या लेकाला नावं ठेवतया, मास्तर झाला पण ग्यान काय आलं न्हाय, पोरं बारकी हुती तवा बरं दिसत हुत, पण अजून किती रोज घालणार, काय कळतयं का न्हायं?

मग माझ्या डोक्यात प्रकाश पडला ही सगळी शेजाऱ्यांची करणी भरणी होती. आईचे, आज्जीचे कान शेजारच्या बायकांनीच भरले होते. म्हणून आज असं कसं झालं होतं, माझं स्फुंदणं चालूचं होतं. हळुहळु बाबा काय म्हणतात की सगळयांसारखं रागवतात हे कळलं नव्हतं. त्यामुळे धडधड वाढली होती. आजी बोलतचं होती, बाबा शांतच होते, पोरीला कायतरी समजावं म्हणाली. तसं बाबा म्हणाले, ''तिला काय आवडतयं ते घालू दे, शर्ट–पॅन्ट तर शर्ट–पॅन्ट,'' माझ्या सहित सर्वजण आवाक. आजी तर भडकलीच, ''लई झालं कौतुक, तुझ्या पोरीनं पोराची कापडं घातली म्हणून गांव काय पोरगं म्हणणाराय, घेऊन बस डोक्यावर माझं पोरगं, माझं पोरगं म्हणत. नांदायला पाठवताना तर पोरगी म्हणशील नव्हं.'' तणतणतच आजी बाहेर पडली. अजुनही बाबा शांतच. मला कोण आनंदा झाला होता. उठून नाचावं वाटत होतं. पण बाबांच्या पुढं? आईपण नाराज होती. ''तुमच्या अशा लाडानं पोरगी शेपाटेल.'' बाबांना म्हणत होती.

लहानपणी कराटे शिकविण्याच्या बाबांनी घेतलेलया निर्णयालाही

असाच विरोध झाला होता. पण मी लहान होती म्हणून सगळयांचा विरोध मावळलाही होता. पण मोठी झाल्यावर मोटारसायकल, चारचाकी शिकविण्याची घेतलेला निर्णय ऐतिहासिक होता. घरातून त्याचबरोबर समाजातून पण विरोध होता. आमच्या गावात कराटे येणारी, दुचाकी, चारचाकी चालविणारी आणि पॅन्ट—शर्ट घालणारी (आजपर्यंत) मी पहिली मुलगी होते. याबद्दल आनंदापेक्षा जास्त दु:खच वाटतयं अजुनही गावातल्या माणसांना बाबा वेळोवेळी मुलींना स्वावलंबी करण्याची किती गरज आहे हे सांगताना माझी मुलगी करू शकते तर तुमची का करू शकत नाही म्हणून विचारताय? आणि मुलींना प्रत्येक गोष्ट शिकवण्यासाठी आजही प्रोत्साहन देतात.

आज बाबांनी गावापुढं समाजापुढं स्वत:च्या मुलीला काही गोष्टी प्रथम शिकवून समाजाबरोबर घरच्यांचाही विरोध न जुमानता मुलींच्या स्वावलंबनाचा खूप मोठा घडा घालून दिला होता. आज गावात काही मुलींना गाडी चालवताना, पॅन्ट—शर्ट घातलेल्या बघतना, कराटे खेळताना बघून माझ्या (स्त्रीच्या) हक्कांविषयी, समानतेचीविषयी मनीच्या आशा अजुन पल्लवित होतात. पण पूर्ण समाधान नाही. (मी पंजाबी कुरता, इतर मुलींच्या कपडयांच्या विरोधात नाही. पण प्रत्येकाची आवड—निवड आणि स्वातंत्र्य महत्वाचं जे मला सगळयांचा रोष पत्करून बाबांनी मिळवून दिलं होतं) आणि या चळवळीची सुरवात सातवीच्या उन्हाळयाच्या सुट्टीत माझ्या कपडयांवरून झाली होती हे विसरण अशक्यचं आणि त्याची आठवण म्हणून तो कुरता अजुनही माझ्या कपाटात आहे नवा कोरा.

कु. आक्षता सुरेश माईनकर
बी. ए. भाग – १



## ✯अविस्मरणीय पेन✯

लेखणीचा असाच निरंतर सहवास लाभो.....

समाजजीवनाची विचारभावना बदलो.......

तेजोमय स्वप्नांची प्रेरणा होवो............

प्रकट सत्याचा दीप सदैव तेवत राहो.......

आपली एखादी आवडती वस्तू सहजगत्या हारवली आणि आपल्याला त्या वस्तूचा कधीच सहवास लाभणार नाही असा विचार जरी मनात आला तरी मन किती अस्वथ होते. याची कल्पना आपल्या सर्वांना आहे. प्रत्येकाच्या जीवनात असे प्रसंग घडत असतात, परंतू आयुष्यात अशा काही घटना असतात की, त्या आपण इतक्या सहजासहजी विसरू शकत नाही. कुठल्या ना कुठल्या तर माध्यमातून आपणास त्या घटनेसे स्मरण होते. तेव्हा मात्र मन उदास झाल्याशिवाय राहत नाही.

पल मे याद आती है...

और पल मे रूला के जाती है...

असं सतत होत असतं. पैसा असला की आपण जगातील कोणतीही वस्तू प्राप्त करू शकतो असे मनाला नेहमी वाटते. मुळात आपली धारणा तशीच झालेली असते. परंतू काही विशिष्ट

वस्तू असतात की, त्या सहज जरी उपलब्ध होत असल्या तरी त्या हरवलेल्या वस्तूंची जागा भरू शकत नाही.

अशीच काहीशी माझ्या मनाला अस्वस्थ करणारी घटना घटली. शालेय जीवनापासून माझ्या सतत सोबतीला असलेला आणि माझ्या सुखदु:खाच्या भावनांना कागदावर उतरविताना लेखणीस्वरूपात जास्तवेळ साथ देणारा शाईचा पेन हरवल्याने मनात नाराजी सतावत

होती. त्या पेनाचा सहवास असा अचानक कायमचा संपेल असे कधीही वाटले नाही.

मनाच्या मस्तीत, स्वत:च्या धुंदीत....
विसरून जग सारे, आनंदाने विहरावे.....
कल्पनांच्या दुनियेत, माझेच राज्य असावे......
तोडूनी बंधन सारे, आसमंत झेपावावे......
रिमझिम बेधुंद क्षण, शिंपल्यांनी अलगद झेलावे....
सुखाचे मोती वेचताना.....
आयुष्यही कमी पडावे....

या काव्याप्रमाणे आपल्या प्रत्येक सुवर्ण आठवणी आठवतात. सुखाचे आणि दु:खाचेही क्षण आपणास सतत पावलोपावली आठवतात. असचं माझ्या आणि माझ्या पेनबद्दल घडले होते. आजकाल लिहिण्याच्या लेखणीमध्ये पुष्कळ प्रकारच्या लेखण्या आपण बाजारात पाहतो. घेतो, हरवतो, परत घेतो. काही लेखण्या 'वापरा आणि फेका'

n

(Use & Throw ) अशा स्वरूपाच्या असतात. तर कही लेखण्या लिहिताना सुगंध सोडतात. काही लेखणीत लाईट असते. अशा नवनवीन लेखण्या आपणास पाहायला मिळतात. ज्या दिवसापासून हातात लेखणी धरायला शिकले तर आजतागायत लेखणीच्या माध्यमातून अवघे जीवच लेखणीमय झाले आहे. त्यामुळे लेखणीशी माझा संबंध तसा मला कळत असल्यापासून ते आजपर्यंत येत आहे आणि रोजच येतो. अगदी लहानपणापासून त्या शाईच्या पेनाची सवय लागली आहे. आणि त्याच्याशिवाय चैन ही पडत नाही. शाईचा पेन आहे म्हणून कपडे किंवा हात, कंपासपेटी आपली खराब होईल असे कधीही मनात विचार नाही. याउलट शाईचा पेन असला की, एक वेगळाच आनंद असतो नाही का? कारण इतर विदयार्थी खूप पेन बदलत असतात आणि आपला विचार केला तर म्हणजे माझ्या वहीत नेहमी वेगळच कारण प्रत्येक पानावर एकच शाई. कलर पेन आणि कोणता वेगळा पेन म्हणून एक वेगळाच आनंद असतो माझ्या शाईच्या पेनात. असा तो माझा शाईचा पेन कुठेतरी सापडावा. मी तो पुन्हा कधीही हरवणार नाही. काळजाच्या कोंदणात संस्कार जपल्याप्रमाणे मी त्याला जपेन.

लेखणी जेव्हा हरवली.

मनातले हितगुज माझ्या कागदावरती उतरायची.
जीवलग मैत्रिण बनून माझ्या सहवासात राहायची.
नाते आमचे बनले होते इतके रक्तापलिकडचे की,
माझ्यासाठीच निळे रक्त कागदावरती सांडायची

वा! किती सुंदर अक्षर, सुरेख हस्ताक्षर तुझे
असे सारे श्रेय तिचे, मीच नकळत लुटायची
अशी माझी सखी सोबती लेखणी जेव्हा हरवली
हसवणाऱ्या मैत्रीणीने आणली वेळ रडायची
तिच्या विरहानंतर मी, बदलल्या बऱ्याच लेखण्या पण तिची जागा नाही
घेतली कोणी जी हृदयात माझ्या वसायची.

आपण म्हणाल साधा पेन हारवला त्यात काय एवढं व्यतीत होण्यासारखं? बाजारात गेले तर हजारो पेन्स् मिळतील. पण माझ्या जीवची जिवलग आणि मला सतत परिक्षेत मार्कस् वाढवून देणारी ती एकमेव माझी होती सखी लेखणी. माझी लेखणी हारवण्यामागचं काण म्हणजे माझ्या १०वी च्या परीक्षेनंतर माझा एक शेवटचा पेपर राहिला होता आणि तो दिला. तो दिल्यानंतर १० वी चे पेपर संपले आणि आज मी शेवटचा पेपर दिला असे जेव्हा वाटले तेव्हा आनंदाला भानचं राहिले नाही. आणि त्या आनंदातच मी माझ्या लेखणीला विसरून आले. म्हणजे पेपर दिला आणि बसलेल्या बॅचमध्येच माझा पेन आणि पट्टी राहिली. जेव्हा मला कळालं माझा पेन माझ्याकडे नाही, तेव्हा मी लगेच जावून त्या बॅचमध्ये पाहिलं. पण तेव्हा तो पेन तिथे नव्हता. क्षणभर एक मैत्रीणीच हारवल्यासारखं झालं आणि तेव्हापासून मला माझी लेखणी सोडून गेली. पण आज मी बरेच वेगवेगळया प्रकारचे पेन्स् वापरते. पण त्या पेनाला जीव लावत नाही. त्या लेखणीच्या विरहाने आजही मन अस्वस्थ होते.

कु. उज्वला मारुती टकले
बी. एस्सी. भाग – ३(संख्या)

## *आदर्श विदयार्थी*

बौध्दिक क्षमेचा विचार करता आज आपला देश जागतिक पातळीवर अव्वल स्थानांवर आहे. भारत हा खेडयापाडयांचा देश आहे. महाराष्ट्र म्हणले की सर्वांना आठवते ती फक्त मुंबई. परंतू मुंबई म्हणजे महाराष्ट्र नव्हे. अन् महाराष्ट्र म्हणजे मुंबई नव्हे. तर महाराष्ट्रातही अनेक शहरे आहेत. खेडी आहेत. असा कही दुर्गम भाग आहे जो अजुनही शैक्षणिक सुविधांपासून वचिंत आहे. मग तो आदिवासी भाग, किंवा दुष्काळी भाग असले. असाच आमचापण भाग दुष्काळी पट्टयात येतो. जतपासून नऊ–दहा किमी अंतरावर आमचं छोटसं गांव. आमच्या गावाचं एक वैशिष्ट म्हणजे आमच्या गावाच्या तिन्ही बाजूनी चार तलाव आहेत व एका बाजूला दोन तलावादरम्यान जोडणारा ओढा आहे. गावातच हायस्कुलपर्यंत शिक्षणची सोय होती. चौथीपर्यंत अगदी थोडयाच अंतरावर आमची शाळा होती. परंतू पाचवीपर्यंत पुढे दहावीपर्यंत गावात जायला लागायच. आणि भरपूर जण असल्यामुळे चालत जायाला खूप मजा यायची. रोज सकाळी लवकर जावून शुध्दलेखन लिहायचो. तर काहीजण परिपाठाची तयारी करायचे, काहीजण मैदानावर खो–खो, कबड्डी खेळायचे. तर काहीजण झाडाखाली अभ्यास करत बसायचे.

आजही मैदानावर जातो तेव्हा मला माझ्या शाळेची आठवण येते. असे अनेक प्रसंग माझ्या जीवनात घडत गेले. त्यातीलच एक अविस्मरणीय प्रसंग म्हणजे, मी दहावीच्या वर्गात शिकत होते. दहावी म्हणलं की इतर गोष्टीकडे जरा दुर्लक्षच करायला सांगतात. परंतू दहावी म्हणजे मला काहीच अवघड किंवा ओझं वाटलं नाही. तर मला ती इतर वर्गासारखीच वाटली. परंतू या वर्गात मला बरेचसे अनुभव येत गेले. प्रत्येक शाळेप्रमाणे आमच्याही शाळेत वार्षिक तपासणी पथक येणार होते आणि वर्षभर चालेल्या कामाचा आढावा त्यांना एका दिवसात सादर करावयाचा होता. त्यासाठी आम्हाला सकाळी आठ वाजताच बोलवलं होतं. ठरल्याप्रमाणे परिपाठानेच दिवसाची सुरवात झाली. तसं म्हणायला गेलं तर ग्रामीण भाग असल्यामुळे दुरवरच्या विदयार्थ्यांना यायला उशीर व्हायचा तरीपण ते धावत पळत येऊन सर्वांत पाठीमागे रांगेत बसायचे. त्या दिवशी मी बोधकथा सांगितली होती. अन् आमच्या परिपाठाचं एक वैशिष्टय म्हणजे आमचे शिपाई साठेकाका. कारण आमच्या संपुर्ण परिपाठाला साठेकाकांचा सुरपेटीच्या संगिताची साथ मिळायची. त्यामुळे खरंतर खूप उत्साही आणि आनंदमय वाटायचं. त्यानंतर लगेच योगासने घेतली होती. थोडया वेळातच सांस्कृतिक कार्यक्रम होता. त्यामध्ये मी सहभाग घेतला होता. ‘ आठवण ठेवावी तू आईच्या दुधाची’ हे भावगीत मी गायलं होतं आणि सर्वांना ते खूप भावलं होतं. त्यानंतर लगेचच लोकनृत्य झालं. खरतर या दिवशी विविध कलाप्रकारात भाग

घेणाऱ्या विदयार्थ्यांची खूप धावपळ होते. कारण मी लोकनृत्य करण्यासाठी घातलेला पोशाख बदलून शाळेच्या गणवेशावर मला संचलन करण्यासाठी जायचं होतं. त्यासाठी खूपच कमी वेळ मिळायचा. तरीपा मी पटकन तयार होवून पळत पळत मैदानावर पोहचले. संचलनासाठी सरांनी तीस--तीस विदयार्थ्यांचे दोन भाग केले होते. प्रत्येक विभागासाठी एक प्रमुख होता. यामध्ये माझ्यासाठी कौतूकाची गोष्ट ही होती की मी मुलगी होते आणि आमच्या शाळेत पहिल्यांदाच दोन्ही विभागाची प्रमुख म्हणून माझी निवड करण्यात आली होती. संचलन मला खूप आवडायचं आणि ते आजही आवडते. या सर्व प्रकारात मी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हायचे. याशिवाय खेळ असो, वक्तृत्व स्पर्धा असो, रांगोळी असो, सुत्रसंचालन असो, निबंधलेखन असो, नाहीतर वर्गसजावट असो या सर्व क्षेत्रात मी सर्वात पुढे असायचे. तसेच अभ्यासातही सर्वात पुढे असायचे. सकाळी राष्ट्रगीतानं सुरवात झालेल्या त्या दिवसाची सांगता वंदे मातरम्। या गीताने झाली.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे आम्ही शाळेत आलो. अकरा वाजता प्रार्थना झाली. त्यानंतर आमचे आवडते मराठीचे शिक्षक ओलेकर गुरूजी पुढे येऊन काल झालेल्या तपासणीबद्दल माहिती देत होते. ते म्हणाले, सर्वांनी खूप वक्तशीरपणे संपुर्ण कार्यक्रम पार पाडला. त्यामुळे तुमचे खूप कौतूक वाटते. त्यानंतरचा क्षण माझ्यासाठी

'आक्रोश ठेंगणा करणारा होता.' कारण या वर्षीचा आदर्श विदयार्थ्याचा किताब मला मिळाला आहे असं त्यांनी घोषित केले. तेव्हा माझ्या आनंदाला पारावरच राहिला नाही. कारण

आजपर्यंत मला असं वाटत होते की, आदर्श विदयार्थी म्हणजे काय? तर आदर्श विदयार्थी तो की जो वर्गामध्ये कमी बोलतो. कायम शांत राहतो. ज्याच कुणाशी देण–घेण नसतं. अभ्यासात मात्र खूप हुशार असतो. अन शिक्षकांचाही खूप लाडका असतो. असा विदयार्थी हाच आमच्या दृष्टीने खरंतर एक आदर्श विदयार्थ्याचा साचा आम्ही आमच्या मनामध्ये तयार केला होता. परंतू आदर्श विदयार्थी म्हणजे काय हे मला त्या दिवशी समजले जेव्हा माझे नाव घोषित केलं गेलं. खरंच तो प्रसंग माझ्या जीवनातील अतिशय आनंदाचा आणि कधीही न विसरणारा असा तो अविस्मरणीय आणि आदर्श प्रसंग होता आणि आहे देखील!

# आवाहन

प्रिय, युवक वाचक मित्र-मैत्रिणीनो युवास्पंदनच्या आत्तापर्यंतच्या पाच अंकांना आपण जो प्रतिसाद दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद। युवास्पंदन हे एकविसाव्या शतकातील महाविद्यालयीन युवकांचे प्रातिनिधिक स्पंदन असल्यामुळे युवकांच्या भावविश्वाविषयी अनेक उत्तम विषयसूत्रे घेऊन अगदी नव्या स्वरूपात युवास्पंदन यापुढेही तुमच्या भेटीला येत राहील आपल्या साहित्यिक जाणीवा विकसित करण्यासाठी आपल्याला लिहिते करण्यासाठी टीम युवास्पंदन कटिबद्ध आहे.

आपल्याला आवाहन करण्यात येते कि आपण युवास्पंदन चे वर्गणीदार व्हा वर्गणी खालीलपैकी कोणत्याहीप्रकारे रोख अगर चेकने संपादक, युवास्पंदन मराठी विभाग पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, यांच्या नावे याच पत्त्यावर पाठविण्यात यावी.

वर्गणी -


एक वर्षाकरिता रु. २००/-

पाच वर्षाकरिता - रु. १०००/-

आजीव वर्गणी रु. २५००/-

संपादक मंडळ

युवास्पंदन



फोटोग्राफी-
स्वप्निल अशोक कुंभार
इतिहास विभाग बी.ए.भाग-३